# चंदगड तालुक्यातील प्राचीन मंदिरे धार्मिक पर्यटनाच्या नव्या संधी

**प्रा.आप्पासाहेब सुमित्रा धोंडीराम कांबळे,** (इतिहास विभाग प्रमुख ,चंदगड)

---

**प्रस्तावना**

मंदिरे म्हणजे आपली सांस्कृतिक ताकद भारतीय माणूस हा जसा धार्मिक आहे तसा तो भावनिक आहे . श्रध्दा ही त्याची ताकद आहे .अगदी प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्व जाती धर्माचे लोक एकमेकांच्या धर्मसंस्कृतीचा आदर करून गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे निर्देशनास येते .राष्ट्रीय एकात्मता दृढ करणेसाठी विविधतेतून एकता असणा-या भारतीय संस्कृतीमधील मंदिर संस्कृतीचा पाया भक्कम करणे आजही गरजेचे आहे . हे करत असताना हळुवारपणे कोणत्याही धर्माला न दुखवता सर्वांचा आदर करून वाटचाल करावी लागेल पर्यटन विकासातून सुशिक्षित बेरोजगार तरूणांच्या हाताला काम देणे करिता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून धार्मिक पर्यटन एक नवी संधी मानून पर्यटन शाश्वत विकास ही नवी संकल्पना रूजवावी लागेल .कारण पर्यटन व्यवसाय हा जगातील दोन नंबरचा व्यवसाय आहे .

कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला असलेला निर्सगाचे मुक्तहस्ते वरदान लाभलेला गोवा व कर्नाटक हाकेच्या अंतरावर असणारा तालुका म्हणजे चंदगड . प्राचीन व मध्ययुगीन काळातील स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असणारी जैन व हिंदू मंदिरे आजही सुस्थितीमध्ये आहेत .आजच्या आधुनिक काळात वेगवेगळ्या मिडीयाच्या माध्यमातून आपण सर्वजण मिळून लोकांपर्यंत आपला सांस्कृतिक खजिना पोहोचवला तर धार्मिक पर्यटन वाढून रोजीरोटीचा प्रश्न मिटू शकेल. चंदगड तालुक्यात धार्मिक पर्यटनाच्या भरपूर संधी आहेत म्हणून त्याला कवटाळून बसण्यापेक्षा त्याचा उपयोग करून जीवनात पुढे जाता आले पाहिजे .कोणत्याही गोष्टीचा नकारात्मक विचार करण्यापेक्षा सकारात्मक विचार करून संधी साधता आली पाहिजे . इतिहास मानवाला खाचखळगे दाखवण्याचे काम करतो हे सत्य आहे पण तो व्यवसाय पर्यटनाच्या संधीही प्राप्त करून देतो हे त्याहूनही सत्य आहे म्हणून धार्मिक पर्यटनाच्या संधी साधत असताना खालील विधान तरूणांनी लक्षात ठेवावे.

" प्रत्येक क्षण हा सोनेरी असतो फक्त ती पारखणारी नजर हवी ."

**उद्देश**

१. चंदगड तालुक्यातील जैन व हिंदू मंदिराची माहिती पर्यटकांपर्यंत पोहचवणे .

२. धार्मिक पर्यटनातून रोजगार निर्मिती होवू शकते .

३. धार्मिक पर्यटनाबरोबर चंदगड तालुक्याचे निसर्ग वैभव , प्राणीयुक्त जंगल ,बारा महिने कोसळणारे धबधबे , औषधी वनस्पती ,रानमेवा इत्यादी पर्यटकांपर्यत पोहचविणे व त्यांचे महत्व अभ्यासणे .

**संशोधन पध्दती**

धार्मिक पर्यटनाच्या नव्या संधी या शोधनिबंधासाठी शासन दरबारी असणारी इब्राहिमपूर , भोगोली , हेरे व पारगड येथील मंदिराच्या नोंदी तसेच त्या भागात असणा-या मिथक कथा, मौखिक परंपरा या सर्व दुय्यम साधनांचा वापर केला आहे .

**धार्मिक पर्यटनवृध्दीसाठी प्रयत्नांची गरज**

सर्व धर्म समभाव हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे . आपलेपणा ,आपुलकी , स्नेहभाव ,परस्पर सहानुभूती, प्रेम या गुणातून आपला धार्मिक विकास झाला आहे . त्यामुळे या पायाभूत चौकटीला धोका न पोहचविता शासन प्रतिनिधी ,जिल्हा व तालुका प्रशासन व स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी धार्मिक पर्यटन विकासाची भूमिका घेऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे . पर्यटन विकासामध्ये स्थानिक भूमिपुत्रांच्या व्यवसाय वाढीला गती द्यावी लागेल लोक प्रतिनिधी स्थानिक जनतेच्या पाठीशी उभी राहण्याची भूमिका घेऊन पर्यटन विकासाची गुढी उभी करावी आणि राजकारण विरहीत पर्यटन विकासाकडे लक्ष द्यावे . संत मोरोपंतांच्या वचनाप्रमाणे " प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे " हा आशावाद आपण अंगिकृत करून आम्हीच आमच्यावरती मागासलेपणाचा शिक्का मारला आहे तो पुसून टाकला पाहिजे नकारात्मक मानसिकता बदलून कोणालाही दोष न देता धार्मिक पर्यटन वृध्दीसाठी आपण प्रयत्न केला पाहिजे तरच येणारी भावी पिढी आम्हाला माफ करेल . पर्यावरण रक्षणातून पर्यटन, रोजगाराच्या संधी ही त्रिसुत्री चंदगड तालुक्यातील तरूणांच्या मनावर बिंबवून विचार वारसा पुढे घेऊन जाऊया .

**धार्मिक पर्यटन-चंदगड तालुक्यातील वारसा स्थळे**

सह्याद्री डोंगर रांगा आंबोली घाट माथ्यावर उगम पावलेली घटप्रभा नदी कायम दुथडी भरून वाहत असते या नदीकाठावर गर्दअशा झाडी मध्ये भोगोली व सरळ रेषेमध्ये असणारे इब्राहिमपूर हया दोन गावात जैन धर्माचे तेविसावे तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांची अप्रतिम स्थापत्य असणारी जैन मंदिरे आजही सुस्थितीत आहेत .तसेच इब्राहिमपूर येथे थोडी पडझड झालेले महादेव मंदिर देखील स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे . पांढरे सोने पिकवणारे चंदगड शहर हे तालुका मुख्यालय आहे . चंदगड शहरात श्री देव रवळनाथाचे पुरातन मंदिर आहे . अखंड चंदगड तालुक्याचे ग्रामदैवत असणारे श्री देव रवळनाथाचे दक्षिणाभिमुख असणारे मंदिर अतिशय रेखीव आहे . तसेच चंदगड पासून ०८ कि.मी. अंतरावर असणारे १२ व्या शतकात कोल्हापूरच्या शिलाहार राजांनी बांधलेले नागनाथ मंदिर हेरे येथे आहे . गर्द झाडीमध्ये असणारे हे मंदिर सुबक अशी दगडी खांबावर कोरलेली अप्रतिम नक्षी पूर्वजांच्या कला –कौशल्याची साक्ष देत आहे . त्याचप्रमाणे बेळगाव –वेंगुर्ला राज्यमार्गावर नागनवाडी जवळ कोरज गावच्या सीमेवर असणा-या कोरजाई मातेचे मंदिर काळ्या भिन्न पाषाणामध्ये दिमाखात उभे आहे . मात्र सर्व लोकप्रतिनिधींनी नकारात्मक विचार न करता सकारात्मक विचार करून धार्मिक पर्यटन एक संधी असा व्यापक दृष्टिकोन ठेवावा. आणि तरूणांच्या हाताला स्थानिक भूमिपुत्राला काम देवून विकास साधावा . पर्यावरणाचे रक्षण करून धार्मिक पर्यटन वाढवता येते अशी संधी असणारी ठिकाणे खालीलप्रमाणे –

**चंदगडचे ग्रामदैवत – श्री देव रवळनाथ**

चंदगड , आजरा, कोकण व गोवा या प्रदेशातील जागृत देवस्थान म्हणजे श्री देव रवळनाथ महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील लाखो लोकांचे श्रध्दास्थान प्रत्येक वर्षी फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात माघ पोर्णिमेनंतरच्या बुधवारी पाच दिवसाची भव्य अशी यात्रा भरते . कोट्यवधी रूपयांची उलाढाल या काळात होत असते . त्यानंतर येणारा चंदगडचा वैशिष्ट्यपूर्ण शिमगोत्सव धार्मिक पर्यटन वाढीसाठी एक सुवर्णसंधी आहे . स्थानिक तरूणांनी बारीक निरीक्षण करून या उत्सवासाठी लागणारे साहित्य याचे मार्केटिंग करून व्यवसाय थाटावेत असे म्हणतात . " कोणतेही काम अवघड नाही , फक्त कामाची सुरूवात करा ."

**हेरे येथील प्राचीन नागनाथ मंदिर**

चंदगड तालुक्यात अनेक गावात शिव –शंकराची अनेक प्राचीन मंदिरे आहेत त्यापैकी एक असणारे हेरे येथील १२ व्या शतकात बांधलेले नागनाथ मंदिर म्हणजे स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे . कोल्हापूरच्या शिलाहार राजांनी बांधलेले हे मंदिर झाडाझुडपात आहे . स्वच्छता व थोडी डागडुजी केली आणि मिडीयाच्या माध्यमातून प्रसिद्धी दिली तर धार्मिक पर्यटनसाठी एक हक्काचे ठिकाण होऊ शकते. फक्त गरज आहे आपली मानसिकता बदलण्याची .

**पारगड किल्ला भवानी मातेचे मंदिर**

प्रतिमहाबळेश्वर म्हणजे चंदगडचा पार कडेचा गड पारगड या शिवकालीन किल्यावरील मंदिरे म्हणजे धार्मिक पर्यटनाची पर्वणीच मानली जाते .पारगड वरील भवानी मातेचे मंदिर पुर्वाभिमुख आहे . त्यामुळे १२ महिने सुर्यकिरणे मंदिरात येतात हा निसर्गरम्य परिसर म्हणजे चंदगड तालुक्याचा स्वर्गच आहे. दूरदृष्टि असणारे स्वर्गीय बाबासाहेब कुपेकर यांनी पारगड किल्ला परिसराला 'क' वर्ग पर्यटनाचा दर्जा देवून विकासाला सुरूवात केली. पण आम्हाला ते टिकवता आले नाही . हा किल्ला शासनाच्या वनखात्याच्या ताब्यात आहे . त्यामुळे या खात्याने तरी धार्मिक पर्यटनाबरोबर १६ हेक्टर पसरलेल्या पारगड वरती एखादा तलाव तयार करून पर्यटन विकास साधावा . आणि विकासाचे एक दमदार पाऊल टाकावे . नव्या युगात पर्यटन व्यवसायाला भरपूर संधी आहे ती साधता आली पाहिजे . नाही तर "बैल गेला आणि झोपा केला " अशी आमची चंदगड तालुकावासियांची अवस्था होईल त्यामुळे आता जनतेने सजग राहिले पाहिजे .

**जैन मंदिरे चंदगड तालुक्याचा स्वाभिमान**

जैन धर्म हा प्राचीन आहे त्यामध्ये तीर्थंकर परंपरा मानली जाते . भगवान महावीर २४ वे तीर्थंकर मानले जातात . त्याच्याअगोदर २५० वर्षे पार्श्वनाथ हे २३ वे तिर्थंकर होवून गेले . चंदगड तालुक्यात इब्राहिमपूर या गावी अप्रतिम कला –कुसर असणारी पार्श्वनाथाची जोड मंदिरे सन्मानाने उभी आहेत अलिकडे बेळगाव कर्नाटक मधील जैन धर्म अनुयायांनी एकत्र येऊन धार्मिक पर्यटन वाढीसाठी सदर मंदिराची आहे त्याच घडीव खांबामधून नवे मंदिर बांधकाम करण्याचा प्रयोग केला आहे . इब्राहिमपूर , ता. चंदगड हे जैन धर्मियांचे धार्मिक पर्यटन व्हावे याकरिता सुंदर असे यात्री निवास बांधले आहे . धार्मिक पर्यटनासाठी हे आवश्यक पाऊल आहे यातून हळुहळु पर्यटकांची संस्था वाढून धार्मिक पर्यटन गतिमान होईल असे वाटते . पार्श्वनाथ मंदिरामध्ये काळ्यापाषाणातील मूर्ती अप्रतिम आहे . या मंदिरापासून उजव्या हाताला तितकेच जुने महादेव

मंदिर आहे . धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी ही उत्तम संधी आहे . त्या डोंगरात असणारे जिवंत पाण्याचे झरे मनाला सुखद गारवा देऊन जातात .

आंबोलीच्या घाटमाथ्यावरून वाहत येणारी घट प्रभा नदी घाटावर भोगोली नावाचे गर्द हिरव्या झाडीत विसावलेले गाव आहे . त्या गावात श्री देव रवळनाथ मंदिराशेजारी इब्राहिमपूर सारखीच पार्श्वनाथाची जोड मंदिरे प्राचीन काळापासून उभी आहेत . शासनाने लक्ष घालून धार्मिक पर्यटन वाढीचा प्रयत्न करणे आणि भुमिपुत्रांच्या हाताला काम व व्यवसाय वृद्धिला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे . तरूणांनी देखील शोधक नजरेतुन बदल हा जीवनाचा एक अविभाज्य घटक मानून प्रयत्न करावेत . धार्मिक पर्यटन मंदिर संस्कृती बघणे म्हणजे फक्त हात जोडणे नव्हे . मंदिरावर कोरलेली शिल्पे बोलकी आतात त्यातला जिवंतपणा अनुभवता आला पाहिजे . तो उघड्या डोळ्यांनी पाहता आला पाहिजे . जिजामातेने शिवाजी महाराजांना जी धार्मिक सहिष्णुता शिकवली त्याच अनुभवातून कोणत्याही धर्मियांचे मंदिर वाचता आले पाहिजे तर आणि तरच धार्मिक पर्यटनाचा आनंद मिळतो .

**कोरजची कोरजाई**

बेळगाव वेंगुर्ला राज्य महामार्गावर नागनवाडी या बाजारपेठ असणा-या गावालगत कोरज नावाच्या गावात गर्द हिरव्याकच झाडीमध्ये मंदिराचा समूह आहे . कोरजाई ही मातृदेवता नवीन मंदिरामध्ये स्थानापन्न आहे . काळ्यापाषाणात असणारी मूर्ती अतिशय सुबक आहे . या देवीच्या मूर्तीकडे पाहिल्यानंतर प्राचीन काळात मातृसत्ताक कुटूंबव्यवस्था होती हे जाणवते कोरजाई मंदिराला लागून नारायणी म्हणजे विष्णू देवतेची मूर्ती एका भग्न मंदिरात उभी आहे . दहा अवतार असणारी ही विष्णू मुर्ती अखंड चंदगड तालुक्यात एकमेव आहे .या परिसरात असणारी शिव-मंदिरे देखील भग्न मंदिरात दिसून येतात . याचा अर्थ शिव व वैष्णव परंपरा हातात हात घालून एकत्र नांदत होत्या . धार्मिक पर्यटनासाठी या सर्व प्राचीन मंदिराचा नियोजन बद्ध विकास करून जनतेपर्यंत पोहचवण्याची जबाबदारी चंदगड तालुका वासियांची आहे . आपले सांस्कृतिक वैभव आपण जपले पाहिजे . ते आपल्या मुलांना दाखविले पाहिजे . आणि जाहिरातीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवून धार्मिक पर्यटन कसे वाढवता येईल हे पाहणे गरजेचे आहे . “चला आज मिळून सारे हा निश्चय करूया रे ! जे जे उन्नत उदात्त उत्तम ,जतन करूया रे !”

**वैजनाथ मंदिर**

बेळगाव जवळ असणारा गिरीदुर्ग शिवकालीन महिपालगड गडाच्या पायथ्याशी शंकर पार्वतीचे जोड मंदिर आहे . धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित होत आहे . पण विकासाची गती कमी आहे हा परिसर जंगली वनस्पतीने युक्त आहे. वैद या शब्दाचा अपभ्रंश होवूनच या देवालयाला वैजनाथ हे नाव पडले आहे . स्थापत्यशास्त्र मंदिर रचनेतून साकारलेले अप्रतिम मंदिर , जिवंत झ-याचे पुष्करणी तळे तसेच महाशिवरात्री रोजी पूजाविधी बघण्यासारखा असतो . धार्मिक पर्यटनाबरोबर वनऔषधी पर्यटनासाठी हा भाग प्रसिद्ध आहे . या बद्दल एक कथा सांगितली जाते . लक्ष्मणाला जेव्हा बाण लागला त्यावेळी संजीवनी वनस्पती आणण्यासाठी शक्तीचे प्रतिक असणारा मारूती डोंगर उचलून आणत असताना त्यातील काही भाग त्या परिसरात पडल्यामुळे वनऔषधी जास्त प्रमाणात सापडतात हे मिथक असते तरी वनऔषधी खरेच जास्तप्रमाणात आहेत हे सत्य आहे . या घनदाट झाडीमध्ये आजही मोठी गुहा आहे . या गुहेमध्ये नरसिंह सरस्वती जवळ – जवळ सव्वा वर्षे आपल्या शिष्यगणासह वास्तव्याला होते या परिसराचा विकास झाला तर एक चांगले धार्मिक पर्यटन स्थळ वैजनाथ मंदिर होवू शकते . फक्त सकारात्मक मानसिकता हवी .

**निष्कर्ष**

१.मंदिरे ही फक्त श्रध्दास्थाने नसतात तर ती राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असतात .

२.धार्मिक पर्यटनामुळे आपल्या पूर्वजांनी दिलेला प्रगल्भ वारसा समजून येतो .

३.जीवनातला आनंद –शांती –सहभाग या सर्व संकल्पना आणि त्याचा सखोल अर्थ पर्यटनातून समजतो .

४.रोजगार निर्मिती व ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मजबुतीकरण याला चालना मिळते .

५. सांस्कृतिक वारसा जतन करणेसाठी धार्मिक पर्यटन व्यापक करणे गरजेचे आहे .

६.धार्मिक पर्यटनातून सामाजिक बांधिलकीचे मजबुतीकरण करता येते .

**समारोप**

बदल हा जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे . हे मान्य करून आपणाला मार्गक्रमण करावे लागेल तरच आपण धार्मिक पर्यटन क्षेत्रात उत्तुंग भरारी मारू शकतो .आपल्याकडे जो सांस्कृतिक वारसा आहे तो लोकांपर्यंत पोहचविता आला पाहिजे . " इतिहास आपल्या भोवताली असतो , पुस्तकापेक्षाही असा इतिहास आपला वारसा आधिक नीटपणे आधोरेखित करत असतो ." तरूणांच्या हाताला काम मिळवून देणकरीता धार्मिक पर्यटन एक सक्षम पर्याय आहे . पण ही संधी जर चंदगड तालुका वासियांनी गमावली तर आमच्या सारखे आम्हीच स्वत: ला ..........मानावे लागेल . चला तर मग चंदगड तालुका धार्मिक पर्यटनाचे केंद्र बनवूया !

*** संदर्भ ***

१. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर –कोल्हापूर जिल्हा .
२. प्रा.शिल्पा कुलकर्णी – महाराष्ट्रातील पर्यटन .
३. डॉ.अमर अडके – महाराष्ट्रातील किल्ले .